पुढारी


# वि. स. खांडेकर यांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांना स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे अभिवादन करण्यात आले. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते वि. स. खांडेकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. एस. पी. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयाच्या संचालिका डॉ. निलांबरी जगताप, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, उदयसिंह राजेयादव उपस्थित होते.

# ‘सायंटिफिक इंडेक्स’मध्ये शिवाजी विद्यापीठ अव्वल

## कुलगुरूंसह ९६ जणांचा समावेश; डॉ. प्रमोद पाटील यांचा एच इंडेक्स सर्वाधिक

सकाळ वृत्तसेवा



डॉ. शिर्के

कोल्हापूर, ता. ३ : जागतिक पातळीवरील संशोधकांची क्रमवारी ‘ए.डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२३’ जाहीर झाली आहे. या क्रमवारीत शिवाजी विद्यापीठातील कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह एकूण ९६ वैज्ञानिक, संशोधकांचा समावेश झाला आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांचा एच इंडेक्स विद्यापीठात सर्वाधिक ८४ इतका आहे.

अमेरिकेच्या मिशीगन विद्यापीठातील प्रा. मूरत आल्पर आणि प्रा. सिहान डॉजर या

> ‘शिवाजी विद्यापीठात विविध विषयांत सुरू असणाऱ्या अखंडित संशोधनामुळेच या यादीतील संशोधकांची संख्या वाढते आहे. यापुढील काळातही विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांतील संशोधकांनी आपले संशोधनकार्य जोमाने करीत राहावे.
>
> - कुलगुरू **डॉ. दिगंबर शिर्के**

दोघांनी संयुक्तपणे ‘आल्पर-डॉजर सायंटिफीक इंडेक्स’ तथा ‘ए.डी. सायंटिफिक इंडेक्स’ विश्लेषित केला आहे. त्यासाठी त्यांनी गुगल स्कॉलरवरील संशोधकांचा गेल्या पाच वर्षांतील एच-इंडेक्स, आय-टेन इंडेक्स हे निर्देशांक तसेच सायटेशन स्कोअर (उद्धरणे) इत्यादी बाबींचे पृथक्करण केले. या संशोधकांत स्थान प्राप्त करणारे कुलगुरू डॉ. दिगंबर

### क्रमवारीत स्थान मिळविलेले विद्यापीठातील संशोधक

- डॉ. केशव राजपुरे, सी. एच. भोसले, ए. व्ही. मोहोळकर, आर. जी. सोनकवडे, व्ही. आर. पुरी, एम. व्ही. टाकळे, टी. जे. शिंदे, एस. बी. सादळे, ए. बी. गडकरी, एस. एस. पाटील (पदार्थविज्ञानशास्त्र), के. एम. गरडकर, एस. एस. कोळेकर, ए. व्ही. घुले, एस. डी. डेळेकर, जी. बी. कोळेकर, डी. एम. पोरे, आर. एस. साळुंखे, एम. बी. देशमुख, जी. एस. राशिनकर, डी. एच. दगडे, एस. एम. पाटील, व्ही. व्ही. गावडे (रसायनशास्त्र), एस. पी. गोविंदवार, जे. पी. जाधव, के. डी. सोनवणे, पी. बी. दंडगे, पी. के. पवार (जैवरसायनशास्त्र), टी. जी. डोंगळे, एस. आर. सावंत, पी. एन. वासंबेकर, आर. आर. मुधोळकर (इलेक्ट्रॉनिक्स), एन. बी. गायकवाड, डी. के. गायकवाड, एस. जी. घाणे, आर. व्ही. गुरव (वनस्पतीशास्त्र), एम. व्ही. शांताकुमार, टी.व्ही. साठे, डॉ. के. मोरे, एम. बी. भिलावे, एस. एम. गायकवाड, एन. ए. कांबळे, एम. व्ही. वाळवेकर, ए. ए. देशमुख (प्राणीशास्त्र), पी. डी. राऊत, विजय कोरे, सोनल चोंदे (पर्यावरणशास्त्र), ए. के. साहू, आर. सी. रणवीर (अन्न विज्ञान व अभियांत्रिकी), के. डी. कुच्चे (गणितशास्त्र), के. के. शर्मा, पी. जे. कसबे, मेघा देसाई (नॅनोसायन्स व तंत्रज्ञान), जॉन डिसूझा, ए. एस. पायघन (फार्मसी), एम. एस. देशमुख, मेघा नानिवडेकर, तृप्ती करेकट्टी, पी. एस. कांबळे, के. व्ही. मारुलकर (मानव्यविद्या आणि भाषा विभाग), व्ही. ए. सावंत, एस. आर. यंकच्ची, यू.आय. बोंगळे, आय.एस. उडचण, एच पंडित (अभियांत्रिकी व तंत्रज्ञान), यश शिंदे, सचिन पन्हाळकर (भूगोल), के. खराडे, के. एस. ओझा (संगणकशास्त्र).

शिर्के संख्याशास्त्र विषयातील एकमेव संशोधक आहेत. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी मटेरियल सायन्स, सौरघट, इलेक्ट्रोमॅग्नेटिझम, गॅस सेन्सर आणि नॅनोविज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधनासाठी क्रमवारीत आघाडीचे स्थान कायम राखले आहे. सन २०२१ पासून शिवाजी विद्यापीठातील संशोधकांनी या यादीमध्ये स्थान प्राप्त केले आहे. सन २०२१मध्ये ४८, सन २०२२ मध्ये ८०, मार्च २०२३ मध्ये ९२ आणि आता ९६ अशा चढत्या क्रमाने विद्यापीठातील संशोधकांची या यादीमधील संख्या वाढत राहिली आहे.

- 4 SEP 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ए. डी. सायंटिफिक इंडेक्स क्रमवारीत शिवाजी विद्यापीठाचे ९६ संशोधक

## कुलगुरू, प्र-कुलगुरूंचा समावेश; प्र-कुलगुरूंचा एच इंडेक्स सर्वाधिक ८४ वर

कोल्हापूर : प्रतिनिधी


जागतिक पातळीवरील संशोधकांची क्रमवारी 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२३' नुकतीच जाहीर करण्यात आली. या जागतिक संशोधकांच्या अद्यायावत क्रमवारीत शिवाजी विद्यापीठातील कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह एकूण ९६ वैज्ञानिक, संशोधकांचा समावेश झालेला आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांचा एच इंडेक्स विद्यापीठात सर्वाधिक ८४ इतका आहे.

अमेरिकेतील मिशीगन विद्यापीठामार्फत हा निर्देशांक २०२१ पासून दरवर्षी जाहीर करण्यात येत आहे. २०२१ मध्ये ४८, २०२२ मध्ये ८०, मार्च २०२३ मध्ये ९२ आणि आता ९६ अशा चढत्या क्रमाने विद्यापीठातील संशोधकांची या यादीमधील संख्या वाढत राहिली आहे.


अमेरिकेच्या मिशीगन विद्यापीठातील प्रा. मुरत आल्पर आणि प्रा. सिहान डॉजर या दोघांनी संयुक्तपणे 'आल्पर-डॉजर सायंटिफिक इंडेक्स' तथा 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स' विश्लेषित केलेला आहे. त्यासाठी त्यांनी गुगल स्कॉलरवरील संशोधकांचा गेल्या पाच वर्षांतील एच-इंडेक्स, आय-टेन इंडेक्स हे निर्देशांक, तसेच सायटेशन स्कोअर इत्यादी बाबींचे पृथक्करण केले. एकूण ५५ देश, १० हजार ८८६ विद्यापीठे आणि ४ लाख ४ हजार २२८ शास्त्रज्ञांच्या संशोधकीय कामगिरीचे विश्लेषण करून एच इंडेक्स, आय १० इंडेक्स आणि सायटेशन इत्यादी शास्त्रीय निकषांवर व्यक्ती आणि संस्थांची उत्पादकता आणि कार्यक्षमता यांचे मूल्यांकन केले जाते.

या रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठातील एकूण ९६ संशोधक-प्राध्यापकांचा समावेश झाला आहे. या यादीत प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांचा सर्वोत्कृष्ट शास्त्रज्ञ असा उल्लेख करण्यात आलेला आहे. क्रमवारीत रसायनशास्त्र १३, पदार्थ विज्ञान १०, जैव रसायनशास्त्र ५, इलेक्ट्रॉनिक्स ३, पर्यावरणशास्त्र ३, फूड सायन्स २, वनस्पतीशास्त्र ३, प्राणीशास्त्र ९, संख्याशास्त्र १, गणित १, नॅनो व तंत्रज्ञान ३, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान ७, मानव्यशास्त्र आणि भाषा विभाग ६.

अत्यंत व्यापक स्तरावर घेण्यात आलेल्या या क्रमवारीमध्ये 'अ++' मानांकित शिवाजी विद्यापीठाच्या ९६ संशोधकांचा समावेश होणे ही महत्त्वाची बाब आहे. या संशोधकांत स्थान प्राप्त करणारे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के संख्याशास्त्र विषयातील एकमेव संशोधक आहेत. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी मटेरियल सायन्स, सौरघट, इलेक्ट्रोमॅग्नेटिझम, गॅस सेन्सर आणि नॅनोविज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधनासाठी क्रमवारीत आघाडीचे स्थान कायम राखले आहे.



डॉ. दिगंबर शिर्के



डॉ. प्रमोद पाटील

यासंदर्भात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले की, 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स'मध्ये संशोधकांची संख्या वर्षागणिक वाढते आहे, ही अतिशय समाधानाची बाब आहे. शिवाजी विद्यापीठात विविध विषयांत सुरू असणाऱ्या अखंडित संशोधनामुळेच या यादीतील संशोधकांची संख्या वाढते आहे. यापुढील काळातही विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांतील संशोधकांनी आपले संशोधनकार्य जोमाने करीत राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

### ए.डी. सायंटिफिक इंडेक्समध्ये स्थान

प्राप्त संशोधकांची नावे अशी : पदार्थविज्ञान शास्त्र : डॉ. प्रमोद पाटील, डॉ. केशव राजपुरे, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. व्ही. आर. पुरी, डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. टी. जे. शिंदे, डॉ. एस. बी. सादळे, डॉ. ए. बी. गडकरी, डॉ. एस. एस. पाटील.

रसायनशास्त्र : डॉ. के. एम. गरडकर, डॉ. एस. एस. कोळेकर, डॉ. ए. व्ही. घुले, डॉ. एस. डी. डेलेकर, डॉ. जी. बी. कोळेकर, डॉ. डी. एम. पोरे, डॉ. आर. एस. साळुंखे, डॉ. एम. बी. देशमुख, डॉ. जी. एस. राशिनकर, डॉ. डी. एच. दगडे, डॉ. एस. एम. पाटील, डॉ. व्ही. व्ही. गावडे.

जैव रसायनशास्त्र : डॉ. एस. पी. गोविंदवार, डॉ. जे. पी. जाधव, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. पी. बी. दंडगे, डॉ. पी. के. पवार.

इलेक्ट्रॉनिक्स : डॉ. टी. जी. डोंगळे, डॉ. एस. आर. सावंत, डॉ. पी. एन. वासंबेकर, डॉ. आर. आर. मुधोळकर.

वनस्पतीशास्त्र : डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. एस. जी. घाणे, डॉ. आर. व्ही. गुरव.

प्राणीशास्त्र : डॉ. एम. व्ही. शांताकुमार, डॉ. टी. व्ही. साठे, डॉ. के. मोरे, डॉ. एम. बी. भिलावे, डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. एन. ए. कांबळे, डॉ. एम. व्ही. वाळवेकर, डॉ. ए. ए. देशमुख.

पर्यावरणशास्त्र : डॉ. पी. डी. राऊत, डॉ. विजय कोरे, डॉ. सोनल चोंदे.

अन्न विज्ञान व अभियांत्रिकी : डॉ. ए. के. साहू, डॉ. आर. सी. रणवीर.

संख्याशास्त्र : डॉ. डी. टी. शिर्के,

गणितशास्त्र : डॉ. के. डी. कुच्चे

नॅनो सायन्स व तंत्रज्ञान : डॉ. के. के. शर्मा, डॉ. पी. जे. कसबे, डॉ. मेघा देसाई.

फार्मसी : डॉ. जॉन डिसूझा, डॉ. ए. एस. पायघन.

मानव्यविद्या आणि भाषा विभाग : डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. मेघा नानिवडेकर, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. के. व्ही. मारुलकर.

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान : डॉ. व्ही. ए. सावंत, डॉ. एस. आर. यंकंच्ची, डॉ. यू. आय. बोंगळे, डॉ. आय. एस. उडचण, डॉ. एच पंडित.

भूगोल : डॉ. यश शिंदे, डॉ. सचिन पन्हाळकर.

संगणकशास्त्र : डॉ. के. खराडे, डॉ. के. एस. ओझा.

4 SEP 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक क्रमवारीत शिवाजी विद्यापीठाचे ९६ संशोधक

## कुलगुरू, प्र-कुलगुरूंचा समावेश; ए. डी. सायंटिफिक इंडेक्सची क्रमवारी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जागतिक पातळीवरील संशोधकांची क्रमवारी 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२३' नुकतीच जाहीर करण्यात आली. जागतिक संशोधकांच्या अद्ययावत क्रमवारीत शिवाजी विद्यापीठातील कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह ९६ वैज्ञानिक, संशोधकांचा समावेश झाला आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांचा एच इंडेक्स विद्यापीठात सर्वाधिक ८४ आहे.

अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठातील प्रा. मुरत आल्पर व प्रा. सिहान डॉजर यांनी संयुक्तपणे 'आल्पर-डॉजर सायंटिफिक इंडेक्स' तथा 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स' विश्लेषित केला आहे. त्यासाठी गुगल स्कॉलरवरील संशोधकांचा गेल्या पाच वर्षांतील एच-इंडेक्स, आय-टेन इंडेक्स निर्देशांक व सायटेशन स्कोअर याचे विश्लेषण केले. ५५ देश व १० हजार ८८६ विद्यापीठे आणि ४ लाख ४ हजार २२८ शास्त्रज्ञांच्या संशोधकीय कामगिरीचे विश्लेषण करून एच इंडेक्स, आय १० इंडेक्स आणि सायटेशन आदी शास्त्रीय निकषांवर व्यक्ती, संस्थांची उत्पादकता आणि कार्यक्षमता यांचे मूल्यांकन केले गेले. व्यापक स्तरावर घेतलेल्या क्रमवारीमध्ये 'अ++' मानांकित शिवाजी विद्यापीठाच्या ९६ संशोधकांचा समावेश होणे ही अभिमानाची बाब आहे. ए. डी. सायंटिफिक इंडेक्समध्ये स्थान मिळविणाऱ्या संशोधकांची नावे :





डॉ. डी. टी. शिर्के



डॉ. पी. एस. पाटील

### संशोधकांच्या क्रमवारीत संख्या वाढली

अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठामार्फत हा निर्देशांक २०२१ पासून दरवर्षी जाहीर करण्यात येतो. पहिल्या वर्षापासून शिवाजी विद्यापीठातील संशोधकांनी यादीमध्ये स्थान प्राप्त केले आहे. २०२१ मध्ये ४८, तर २०२२ मध्ये ८०, मार्च २०२३ मध्ये ९२ आणि आता ९६ अशा चढत्या आलेखाच्या क्रमाने विद्यापीठातील संशोधकांच्या यादीमधील संख्या वाढत आहे.

**पदार्थविज्ञानशास्त्र :** डॉ. पी. एस. पाटील, डॉ. केशव राजपुरे, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. व्ही. आर. पुरी, डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. टी. जे. शिंदे, डॉ. एस. बी. सादळे, डॉ. ए. बी. गडकरी, डॉ. एस. एस. पाटील. **रसायनशास्त्र :** डॉ. के. एम. गरडकर, डॉ. एस. एस. कोळेकर, डॉ. ए. व्ही. घुले, डॉ. एस. डी. डेलेकर, डॉ. जी. बी. कोळेकर, डॉ. डी. एम. पोरे, डॉ. आर. एस. साळुंखे, डॉ. एम. बी. देशमुख, डॉ. जी. एस. राशिनकर, डॉ. डी. एच. दगडे, डॉ. एस. एम. पाटील, डॉ. व्ही. व्ही. गावडे.

**जैवरसायनशास्त्र :** डॉ. एस. पी. गोविंदवार, डॉ. जे. पी. जाधव, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. पी. बी. दंडगे, डॉ. पी. के. पवार. **इलेक्ट्रॉनिक्स :** डॉ. टी. जी. डोंगळे, डॉ. एस. आर. सावंत, डॉ. पी. एन. वासंबेकर, डॉ. आर. आर. मुधोळकर. **वनस्पतीशास्त्र :** डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. एस. जी. घाणे, डॉ. आर. व्ही. गुरव. **प्राणीशास्त्र :** डॉ. एम. व्ही. शांताकुमार, डॉ. टी. व्ही. साठे, डॉ. के. मोरे, डॉ. एम. बी. भिलावे, डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. एन. ए. कांबळे, डॉ. एम. व्ही. वाळवेकर, डॉ. ए. ए. देशमुख. **पर्यावरणशास्त्र :** डॉ. पी. डी. राऊत, डॉ. विजय कोरे, डॉ. सोनल चोंदे. **अन्न विज्ञान व अभियांत्रिकी :** डॉ. ए. के. साहू, डॉ. आर. सी. रणवीर.

**संख्याशास्त्र :** डॉ. डी. टी. शिर्के. **गणितशास्त्र** - डॉ. के. डी. कुचे.

**नॅनोसायन्स व तंत्रज्ञान :** डॉ. के. के. शर्मा, डॉ. पी. जे. कसबे, डॉ. मेघा देसाई. **फार्मसी :** डॉ. जॉन डिसूझा, डॉ. ए. एस. पायघन. **मानव्यविद्या आणि भाषा विभाग :** डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. मेघा नानिवडेकर, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. के. व्ही. मारुलकर. **अभियांत्रिकी व तंत्रज्ञान :** डॉ. व्ही. ए. सावंत, डॉ. एस. आर. यंकच्ची, डॉ. यु. आय. बोंगळे, डॉ. आय. एस. उडचण, डॉ. एच पंडित. **भूगोल :** डॉ. यश शिंदे, डॉ. सचिन पन्हाळकर. **संगणकशास्त्र :** डॉ. के. खराडे, डॉ. के. एस. ओझा.

> 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स'मध्ये संशोधकांची संख्या वर्षागणिक वाढत आहे, ही समाधानाची बाब आहे. विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांतील संशोधकांचे हे कार्य अभिनंदनीय आहे. विविध विषयांत सुरू असणाऱ्या अखंडित संशोधनामुळे यादीतील संशोधकांची संख्या वाढत आहे. यापुढील काळात संशोधकांनी आपले संशोधन कार्य जोमाने करीत राहावे.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

- 4 SEP 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# इंडेक्स क्रमवारीत विद्यापीठाचे ९६ संशोधक

## कुलगुरू, प्र-कुलगुरूंचा समावेश : प्र-कुलगुरूंचा एच इंडेक्स सर्वाधिक ८४

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

जागतिक पातळीवरील संशोधकांची क्रमवारी 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२३' जाहीर झाली. या जागतिक संशोधकांच्या अद्यावत क्रमवारीत शिवाजी विद्यापीठातील कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह एकूण ९६ वैज्ञानिक, संशोधकांचा समावेश आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांचा एच इंडेक्स विद्यापीठात सर्वाधिक ८४ इतका आहे.

अमेरिकेतील मिशीगन विद्यापीठामार्फत निर्देशांक सन २०२१ पासून दरवर्षी जाहीर करते. सन २०२१ मध्ये ४८, सन २०२२ मध्ये ८०, मार्च २०२३मध्ये ९२ आणि आता ९६ अशा चढत्या क्रमाने विद्यापीठातील संशोधकांची या यादीमधील संख्या वाढत आहे. अमेरिकेच्या मिशीगन विद्यापीठातील प्रा. मूरत आलपर आणि प्रा. सिहान डॉजर या दोघांनी संयुक्तपणे 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स' विश्लेषित केला आहे. गुगल स्कॉलरवरील संशोधकांचा गेल्या पाच वर्षातील एच-इंडेक्स, आय-टेन इंडेक्स हे



निर्देशांक तसेच सायटेशन स्कोअर (उद्धरणे) आदींचे पृथक्करण केले.

एकूण ५५ देश, १०,८८६ विद्यापीठे आणि ४ लाख ४ हजार २२८ शास्त्रज्ञांच्या संशोधकीय कामगिरीचे विश्लेषण करून एच इंडेक्स, आय १० इंडेक्स आणि सायटेशन इत्यादी शास्त्रीय निकषांवर व्यक्ती आणि संस्थांची उत्पादकता, कार्यक्षमतांचे मूल्यांकन केले. या रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठातील ९६ संशोधक-प्राध्यापकांनी स्थान मिळवले. गतवर्षीच्या संशोधकांनी आपले स्थान कायम राखले आहे. या संशोधकांत स्थान प्राप्त करणारे कुलगुरू डॉ. शिर्के संख्याशास्त्र विषयातील एकमेव संशोधक आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी मटेरियल सायन्स, सौरघट, इलेक्ट्रोमॅग्नेटिझम, गॅस सेन्सर आणि नॅनोविज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधनासाठी क्रमवारीत आघाडीचे स्थान कायम राखले आहे.

### संशोधकांची नावे

■ **पदार्थविज्ञान शास्त्र** - डॉ. प्रमोद पाटील, डॉ. केशव राजपुरे, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ.व्ही. आर. पुरी, डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. टी. जे. शिंदे, डॉ. एस. बी. सादळे, डॉ.ए. बी. गडकरी, डॉ. एस. एस. पाटील. ■ **रसायनशास्त्र**- डॉ. के. एम. गरडकर, डॉ. एस. एस. कोळेकर, डॉ. ए. व्ही. घुले, डॉ. एस. डी. डेलेकर, डॉ. जी. बी. कोळेकर, डॉ. डी. एम. पोरे, डॉ. आर. एस. साळुंखे, डॉ. एम. बी. देशमुख, डॉ. जी. एस. राशिनकर, डॉ. डी. एच. दगडे, डॉ. एस. एम. पाटील, डॉ. व्ही. व्ही. गावडे. ■ **जैवरसायनशास्त्र**- डॉ. एस. पी. गोविंदवार, डॉ. जे. पी. जाधव, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. पी. बी. दंडगे, डॉ. पी. के. पवार. ■ **इलेक्ट्रॉनिक्स**- डॉ. टी. जी. डोंगळे, डॉ. एस. आर. सावंत, डॉ. पी. एन. वासंबेकर, डॉ. आर. आर. मुधोळकर. वनस्पतीशास्त्र- डॉ.एन. बी. गायकवाड, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. एस. जी. घाणे, डॉ. आर. व्ही. गुरव. ■ **प्राणीशास्त्र**- डॉ. एम. व्ही. शांताकुमार, डॉ. टी. व्ही. साठे, डॉ. के. मोरे, डॉ. एम. बी. भिलावे, डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. एन. ए. कांबळे, डॉ. एम. व्ही. वाळवेकर, डॉ. ए. ए. देशमुख. ■ **पर्यावरणशास्त्र**- डॉ. पी. डी. राऊत, डॉ. विजय कोरे, डॉ. सोनल चोंदे. अन्न विज्ञान व अभियांत्रिकी- डॉ. ए. के. साहू, डॉ. आर. सी. रणवीर. ■ **संख्याशास्त्र**- डॉ. डी. टी. शिर्के. गणित शास्त्र- डॉ. के. डी. कुच्चे. ■ **नॅनोसायन्स व तंत्रज्ञान**- डॉ. के. के. शर्मा, डॉ. पी. जे. कसबे, डॉ. मेघा देसाई. ■ **फार्मसी**- डॉ. जॉन डिसूझा, डॉ.ए.एस. पायघन. मानव्यविद्या आणि भाषा विभाग- डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. मेघा नानिवडेकर, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. के. व्ही. मारुलकर. ■ **अभियांत्रिकी व तंत्रज्ञान**- डॉ. व्ही. ए. सावंत, डॉ. एस. आर. यंकंच्ची, डॉ. यू. आय. बोंगळे, डॉ. आय. एस. उडचण, डॉ. ■ **एच पंडित.** भूगोल- डॉ. यश शिंदे, डॉ. सचिन पन्हाळकर. ■ **संगणक शास्त्र** - डॉ. के. खराडे, डॉ. के. एस. ओझा.

जनसंपर्क कक्ष

4 SEP 2023

लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ए. डी. सायंटिफिक इंडेक्सच्या क्रमवारीत शिवाजी विद्यापीठातील १६ संशोधक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जागतिक संशोधकांच्या अद्ययावत क्रमवारीत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह एकूण १६ वैज्ञानिक, संशोधकांचा समावेश झालेला आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांचा एच इंडेक्स विद्यापीठात सर्वाधिक ८४ इतका आहे.

जागतिक पातळीवरील संशोधकांची क्रमवारी 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२३' नुकतीच जाहीर करण्यात आली. अमेरिकेतील मिशीगन विद्यापीठामार्फत हा निर्देशांक २०२१ पासून दरवर्षी जाहीर होतो. एकूण ५५ देश, १०,८८६ विद्यापीठे आणि ४ लाख ४ हजार २२८ शास्त्रज्ञांच्या संशोधकीय कामगिरीचे विश्लेषण करून एच इंडेक्स, आय १० इंडेक्स आणि सायटेशन इत्यादी शास्त्रीय निकषांवर व्यक्ती आणि संस्थांची उत्पादकता आणि कार्यक्षमता यांचे मूल्यांकन केले जाते. कुलगुरू डॉ. शिर्के संख्याशास्त्र विषयातील एकमेव संशोधक आहेत. तर, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी मटेरिअल सायन्स, सौरघट, इलेक्ट्रो मॅग्नेटिझम, गॅस सेन्सर आणि नॅनो विज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधनात आघाडीचे स्थान कायम राखले.

'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स'मध्ये संशोधकांची संख्या वर्षागणिक वाढते आहे, ही समाधानाची बाब आहे. विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांतील संशोधकांचे हे कार्य अभिनंदनीय आहे. शिवाजी विद्यापीठात विविध विषयांतील अखंडित संशोधनामुळेच ही संशोधकांची संख्या वाढते आहे. पुढील काळातही आपल्या संशोधकांनी संशोधनकार्य जोमाने करीत राहावे.

\- डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ.

लोकमत

# प्रमोद पाटील तैवानमध्ये झाले चेअर प्रोफेसर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची तैवान येथील नॅशनल डोंग ह्वा विद्यापीठाच्या मानद



युनिव्हर्सिटी चेअर प्रोफेसरपदी निवड करण्यात आली आहे. ही निवड वर्षासाठी असून, ह्वा विद्यापीठाचे अध्यक्ष हान चिह चाओ यांनी नियुक्तीचे पत्र प्रदान केले आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील हे सेमीकंडक्टर डिव्हाईसेस तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने तेथील संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. मटेरियल सायन्स आणि तदअनुषंगिक विषयांवर व्याख्याने देणे, तैवान विद्यापीठातील भौतिकशास्त्र व मटेरियल सायन्स विभागातील प्राध्यापकांशी चर्चा, नवीन संकल्पनांच्या आधारावर संयुक्त संशोधन प्रकल्प सादरीकरण, आदी संयुक्त संशोधन कार्ये करणे अभिप्रेत आहे. शिवाजी विद्यापीठ व नॅशनल डोंग ह्वा विद्यापीठामध्ये संशोधन साहचर्य वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने ही महत्त्वाची संधी आहे.

> शिवाजी विद्यापीठाचा एक संशोधक-प्राध्यापक म्हणून अशी आंतरराष्ट्रीय दर्जाची मानद संधी मिळणे, हा माझा बहुमान आहे. या संधीचा लाभ विद्यापीठातील मटेरियल सायन्सच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधकांसाठी निश्चितपणे करेन. त्याचप्रमाणे विद्यापीठाचे मानांकन उंचावण्यासाठीही ही संधी उपयुक्त ठरेल.
>
> **- डॉ. प्रमोद पाटील, प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ.**

पुढारी

# डॉ. पी. एस. पाटील तैवानच्या युनिव्हर्सिटीचे मानद चेअर प्रोफेसर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची तैवान येथील नॅशनल डोंग विद्यापीठाच्या मानद युनिव्हर्सिटीच्या चेअर प्रोफेसरपदी निवड करण्यात आली. ही निवड एक वर्षासाठी असून विद्यापीठाचे अध्यक्ष हान चिह चाओ यांनी नियुक्तीचे पत्र प्रदान केले.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील हे सेमीकंडक्टर डिव्हाईसेस तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने तेथील संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. मटेरियल सायन्स आणि तद्अनुषंगिक विषयांवर व्याख्याने देणे, तैवान विद्यापीठातील भौतिकशास्त्र व मटेरियल सायन्स विभागातील प्राध्यापकांशी चर्चा, नवीन संकल्पनांच्या आधारावर संयुक्त संशोधन प्रकल्प सादरीकरण, शोधनिबंधांचे प्रकाशन, पेटंट सादरीकरण इत्यादी संयुक्त संशोधन कार्य करणार आहेत. कुलपती रमेश बैस व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

सकाळ

# तैवान विद्यापीठाच्या मानद चेअर प्रोफेसरपदी डॉ. प्रमोद पाटील

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची तैवान येथील नॅशनल डोंग विद्यापीठाच्या मानद युनिव्हर्सिटी चेअर प्रोफेसरपदी निवड करण्यात आली आहे. ही निवड एक वर्षासाठी असून विद्यापीठाचे अध्यक्ष हान चिह चाओ यांनी नियुक्तीचे पत्र प्रदान केले आहे.



प्र-कुलगुरू
डॉ. प्रमोद पाटील

प्र-कुलगुरू डॉ. पाटील हे सेमीकंडक्टर डिव्हाईसेस तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने तेथील संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. त्याचप्रमाणे मटेरियल सायन्स आणि तदअनुषंगिक विषयांवर व्याख्याने देणे, तैवान विद्यापीठातील भौतिकशास्त्र व मटेरियल सायन्स विभागातील प्राध्यापकांशी चर्चा, नवीन संकल्पनांच्या आधारावर संयुक्त संशोधन प्रकल्प सादरीकरण, शोधनिबंधांचे प्रकाशन, पेटंट सादरीकरण इत्यादी संयुक्त संशोधनकार्ये करणे अभिप्रेत आहे. शिवाजी विद्यापीठ व नॅशनल डोंग विद्यापीठामध्ये संशोधन सहचर्य वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने ही महत्त्वाची संधी आहे. दरम्यान, प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाचा एक संशोधक-प्राध्यापक म्हणून अशी आंतरराष्ट्रीय दर्जाची मानद संधी मिळणे हा माझा बहुमान आहे. या संधीचा लाभ विद्यापीठातील मटेरियल सायन्सच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधकांसाठी निश्चितपणे करेन. त्याचप्रमाणे विद्यापीठाचे मानांकन उंचावण्यासाठीही ही संधी उपयुक्त ठरेल.'

तरूण भारत

# तैवान विद्यापीठाच्या मानद चेअर प्रोफेसरपदी डॉ. प्रमोद पाटील

प्रतिनिधी
कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची तैवान येथील नॅशनल डोंग ह्वा विद्यापीठाच्या मानद युनिव्हर्सिटी चेअर प्रोफेसरपदी निवड झाली आहे. ही निवड एक वर्षासाठी असून विद्यापीठाचे अध्यक्ष हान चिह चाओ यांनी नुकतेच नियुक्तीचे पत्र प्रदान केले आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांना मिळालेल्या या संधीबद्दल कुलपती रमेश बैस आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील हे सेमीकंडक्टर डिव्हाईसेस तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने तेथील संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. त्याचप्रमाणे मटेरियल सायन्स आणि तदअनुषंगिक विषयांवर व्याख्याने देणे, तैवान विद्यापीठातील भौतिकशास्त्र व मटेरियल सायन्स विभागातील प्राध्यापकांशी चर्चा, संयुक्त संशोधन प्रकल्प सादरीकरण, शोधनिबंधांचे प्रकाशन, पेटंट सादरीकरण इत्यादी संयुक्त संशोधनकार्ये करणे अभिप्रेत आहे. शिवाजी विद्यापीठ व नॅशनल डोंग हवा विद्यापीठामध्ये संशोधन साहचर्य वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने ही महत्त्वाची संधी आहे.

## विद्यापीठाचे मानांकन उंचावण्यासाठी ही संधी उपयुक्त

शिवाजी विद्यापीठाचा एक संशोधक-प्राध्यापक म्हणून अशी आंतरराष्ट्रीय दर्जाची मानद संधी मिळणे हा माझा बहुमान आहे. या संधीचा लाभ विद्यापीठातील मटेरियल सायन्सच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधकांसाठी निश्चितपणे करेन. त्याचप्रमाणे विद्यापीठाचे मानांकन उंचावण्यासाठीही ही संधी उपयुक्त ठरेल.

प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील (शिवाजी विद्यापीठ)

- 4 SEP 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रमामुळे रोजगाराची संधी : ज्येष्ठ योगतज्ज्ञ जोशी

**कोल्हापूर :** योगशास्त्राचे गाढे अभ्यासक बनून जगभरामध्ये योगाचा प्रचार आणि प्रसार करण्याची व रोजगार प्राप्त करण्याची उत्तम संधी शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. योगशास्त्र या अभ्यासक्रमामुळे निर्माण झालेली आहे, असे प्रतिपादन पुणे येथील ज्येष्ठ योगतज्ज्ञ कृष्णा जोशी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत या शैक्षणिक वर्षापासून एम. ए. योगशास्त्र या दोन वर्षे कालावधीच्या अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

योगतज्ज्ञ जोशी म्हणाले, जगभरातील लोक निरोगी जीवन जगण्यासाठी योगाभ्यास करत आहेत. योगसनांचे विविध फायदे असले तरी योगासने करण्याचे काही नियम आहेत. योगासने हे योग्य पद्धतीने केले तरच त्याचे फायदे मिळतात. योगामुळे लक्ष आणि एकाग्रता शक्ती वाढते. काम करण्यासाठी आणि दिवसभर सक्रिय राहण्यासाठी ऊर्जा निर्माण करते. आजच्या व्यस्त जीवनात, तणाव दूर करण्यासाठी योगाकडे एक औषध म्हणून पाहिले पाहिजे. कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.

पुढारी

# 'दूरशिक्षण'च्या प्रवेश प्रक्रियेस ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ची बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम. एस्सी. (गणित) आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यास केंद्रांच्या प्रवेश प्रक्रियेस विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता प्राप्त झाली आहे. त्यामुळे विद्यार्थी, गृहिणी, कामगार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, सरकारी कर्मचारी, खासगी कंपन्यांत काम करणाऱ्यांना ८७ अभ्यास केंद्रांत प्रवेशाची संधी मिळणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education लिंकवर प्रवेशाची जाहिरात उपलब्ध असून http://sukapps.unishivaji.ac.in/studentregistration/#/ या ऑनलाईन लिंकवर आपला प्रवेश निश्चित करावा.

पुढारी

# देशाच्या जडणघडणीत शैक्षणिक संस्थांचे योगदान अनन्यसाधारण

## राज्यपाल रमेश बैस

वर्धा : पुढारी वृत्तसेवा

देशाच्या जडणघडणीत शैक्षणिक संस्थांनी दिलेले योगदान अनन्यसाधारण असल्याचे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी रविवारी केले. येथील महाकाली शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेच्या सभागृहात गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा व शिवशंकर सभागृहाचे उद्‌घाटन राज्यपालांच्या उपस्थितीत पार पडले. त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले भारताने जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनविण्याचे ध्येय ठेवले आहे. देशात होत असलेली शैक्षणिक प्रगती आपल्या विकासाचा आधार आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने परिवर्तनवादी दृष्टिकोन अवलंबला आहे. आजचे जग कौशल्य अंगिकारण्याचे आहे.